दिनांक १३/०३/२०२० रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने " **BEST CONVICTION OF THE MONTH** " माहे जानेवारी –२०२० या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ जानेवारी– २०२०

| | | |
|---|---|---|
| ०५ | कस्तुरबामार्ग पो. ठाणे, परिमंडळ – १२ | गु.र.क्र. १७८/२०१३, कलम ३०२ भा.द.वि. |

—: खुन :—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयातील आरोपी कमलेश राजपत मिश्रा, वय ४६ वर्षे हा रेल्वेत नोकरीस असून तो गेल्या ५ ते ६ महिने कामावर न गेल्यामुळे त्याला पगार मिळाला नाही. घरात पैशाची चणचण निर्माण होवुन घरातील एलपीजी गॅस व लाईट बिल भरण्यास पैसे नसल्यामुळे त्याची पत्नी कुसुमकला कमलेश मिश्रा हिच्याशी त्याचे वादविवाद व भांडण झाले. नमुद भांडणाचा राग मनात ठेवून दि. २२/०६/२०१३ रोजी आरोपीने घरातील मसाला वाटण्याचा पाटा पत्नीच्या डोक्यात घालुन तिचा खुन केला म्हणुन गुन्हा दाखल.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | कु.श्वेता अशोक मिश्रा, वय १४ वर्षे |
| बळीत/मयत | :— | कुसुमकला कमलेश मिश्रा, वय ३८ वर्षे |
| आरोपी अटक व दिनांक | :— | कमलेश राजपत मिश्रा वय ४० वर्षे<br>दि. २२/०६/२०१३ |
| निकाल दिनांक | :— | दिनांक ३१/०१/२०२० |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | भादवि कलम ३०२ भादविस करीता जन्मठेप (सश्रम कारावास ) व रू. ५०००/— दंड तसेच दंड न भरल्यास १ वर्ष कारावासाची शिक्षा दिली आहे. |

**तपास कौशल्य** :— . तपासी पथकातील पोलीस अधकारी स.पो.नि निशिकांत राजाराम सावंत व स. पो.नि. नितीन सावंत यांनी नमुद गुन्हयातील आरोपीस शिक्षा हाईल अशाप्रकारे साक्षिदार व पंच यांचा शोध घेवुन त्यांचा जबाब नोंद केला तसेच १६४ सी.आर.पी.सी. अन्वये साक्षिदारांचा जबाब नोंद करण्यास पाठपुरावा केला. नमुद खटल्यातील साक्षिदार यांना समन्स बजावुन फिर्यादी, साक्षिदार व पंच हे मा. न्यायालयात कोणत्याही दबावाखाली न राहता आरोपीस शिक्षा होण्याइतपत साक्ष देतील याची खबरदारी घेण्यात आली. मा. न्यायालयात वेळेत दोषारोपपत्र सादर केले. तपासी अधिकारी यांनी नोंदविलेले साक्षीदारांचे जबाब व सादर करण्यात आलेले पुरावे हे सिध्द झाल्याने यातील आरोपीस शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

कस्तुरबामार्ग, पोलीस ठाणे पथकातील तपासी अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | नितीन तडाखे | प्रशस्तीपत्रक |
| २ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | निशिकांत राजाराम सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | नितीन सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पोलीस हवालदार क्रमांक २८८६१ | विल्यम डिसोझा | |
| ५ | पोलीस नाईक क्रमांक ९७०९८७ | रत्नाकर पवार | प्रशस्तीपत्रक |